**SANSKRUTI INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL**

***Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj***

.....................................................................................

# रा . ना . चव्हाणांचे सत्यशोधक समाजाविषयीचे विचार

प्रमोद सुकुमार कराडे

राज्यशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

ईमेल –karadepramod04@gmail.com

**प्रास्ताविक :**

सत्यशोधक समाज ही पहिली ब्राह्मणे तर चळवळ होती. उच्च जातीच्या कचाट्यातून कनिष्ठ जातीची सोडवणूक करण्यासाठी म. फुले यांनी 24 सप्टेंबर 1873 रोजी पुणे शहरात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जाती ऐवजी व्यक्तीच्या पात्रतेवर भर देणे हे सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट होते . या समाजाने अनेक सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आणल्या. त्या समाजाने स्त्रिया व कनिष्ठ जातीत शिक्षण प्रसार घडवून आणण्यास मोठी चालना दिली. तसेच जातीव्यवस्थेवर हल्ला केला.

शूद्र ती शूद्र व इतर कनिष्ठ जातीवर ब्राह्मण पुरोहित वर्गाने जी धार्मिक आणि मानसिक गुलामगिरी लादली. त्यातून त्यांना मुक्त करणे तसेच ब्राह्मणांकडून होणारे त्यांचे शोषण व दमण थांबविणे हे सत्यशोधक समाजाचे मुख्य उद्दिष्ट होते. आपणास अनुकूल ठरेल अशा प्रकारे ब्राह्मणांनी प्रत्येक बाबतीत धर्माच्या नावाखाली आपली मक्तेदारी निर्माण केली असून त्यातून सामाजिक विषमता निर्माण झाली आहे. असे महात्मा फुलेंचे मत होते, म्हणूनच त्यांनी हिंदू धर्म, ब्राह्मण पुरोहित वर्ग, मूर्ती पूजा, अन्य कर्मकांड आणि हिंदू धर्मग्रंथ या सर्वांवर घनाघाती टीका केली. फुले यांनी कोणत्याही एका विशिष्ट धर्मावर किंवा देवावर श्रद्धा ठेवली नाही. त्यांनी ईश्वरास निर्मिक असे म्हटले. हे विश्व ईश्वराने निर्माण केले असून सर्व धर्म व धर्मग्रंथ हे मानवनिर्मित आहेत. यावर त्यांचा दृढ विश्वास होता. याच विचारांचा रा. ना. चव्हाण यांनी पुरस्कार केला आहे.

**रा.ना.चव्हाणांचे सत्यशोधक समाजाविषयीचे विचार :**

दलित मित्र रा. ना. चव्हाण यांनी विपुल लेखन केले आहे.त्यांनी विविध विषयावरती जवळजवळ १४०० ते १५०० लेख लिहिले आहेत. रा. ना. चव्हाण यांनी प्रामुख्याने महाराष्ट्रातील आद्यसमाज क्रांतिकारक महात्मा ज्योतिराव फुले आणि सत्यशोधक समाजाच्या संदर्भात सन १९५० ते १९८४ या कालावधीत लेखन केले आहे.

रा. ना. चव्हाणांच्या मते १८७३ च्या काळामध्ये महाराष्ट्र मध्ये प्रार्थना समाज, उत्तरेमध्ये ब्राह्मो समाज, व दयानंदांचा आर्य समाज प्रभावी होता. संघटित व पद्धतशीरपणे त्यांची कामे चालली होती. पण यांची ठेवण व पद्धत मुख्यतः आध्यात्मिक व धार्मिक होती. संसार प्रपंचामध्ये रयत उपाशी, तापाशी व गोरगरीब अभवस्त्रास महाग झाले होते. जनता दुःखामुळे हैराण होती. म्हणूनच पूर्वीची भागवत धर्मीय वारकरी चळवळ व त्यांच्या काळातील प्रार्थना समाजाची चळवळ दीनदुबळ्यांचा निरक्षर, नागऱ्या जनतेचे ऐहीक व सामाजिक प्रश्न सोडवू शकणार नाही. एवढेच

नव्हे तर त्यांच्या प्रश्नांची त्यांना कल्पनाही नाही. म्हणूनच बहुजन समाजाच्या उद्धारासाठी जोतिबांनी १८७३ साली. नवीन काळाची गरज म्हणून सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

सत्यशोधक समाजाचे इतिहासात आत्तापर्यंत व्यवहारिक दृष्टी दिसून येते. जनतेशी समरस होऊन त्याने जागृतीची फार मोठे कार्य केले आहे. अभिमान स्वावलंबन वाढविले आहे. शिक्षण प्रसारास जोराची चालना दिली आहे. महात्मा फुले यांची कारकीर्द श्री. राजश्री शाहू महाराजांचा काळ, व त्यानंतर महात्मा गांधी पर्यंतची वर्षे असे तीन कालखंड सत्यशोधक समाजाचे इतिहासात आढळत असेरा.ना. चव्हाण यांचे मत होते.

रा. ना. चव्हाणांच्या मते, सत्यशोधक समाजाला ठराविक गुरु अवतार किंवा एकच पैगंबर, एकच ख्रिस्त देव किंवा मध्यस्थी नाही. शुद्ध प्रामाण्य नाही एकच ठराविक धर्मग्रंथ नाही. एकच कोणतेही पुस्तक त्याला सर्व प्रमाण नाही. त्याच्या शोधाला बांध व अनिष्ट बंधन नाही. येथे विचार स्वातंत्र्य व व्यक्ती स्वातंत्र्य आहे. संप्रदाय नाही. ठराविक गुरु मंत्र नाही किंवा वारकरी पंथासारखी माळ, बुक्का इ. बाह्य चिन्हे नाहीत. सत्यशोधक समाज म्हणजे जात नाही. सत्यशोधक समाज म्हणजे वेगळा धर्म नाही. सर्वधर्म त्याचे आहेत. सत्य सर्वत्र असते. सत्य सर्व व्यापी आहे. धर्म भोळे पण जोडणे व सोडावयास लावणे हे त्याचे कार्य आहे. धर्म भोळेपणाच्या विरुद्ध तो आहे. चिकित्सा, मिमांसा, टीका आणि बौद्धिक विवरण करणे हे त्याचे कार्य आहे. बुद्धिवाद हा त्याचा प्राण आहे. तो विज्ञानाच्या किंवा विविध आधुनिक शास्त्रांच्या विरुद्ध नाही असे रा . ना. चव्हाण सांगताना दिसतात.

रा. ना. चव्हाणांच्या मते, सत्यशोधक समाजाची काही तत्वे सांगितले आहेत. त्यामध्ये

१) ईश्वर एक असून तो सत्य स्वरूप आहे, सर्व मनुष्यप्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.
२) ईश्वराची भक्ती करण्यास प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आई बापास संतोष करण्यास त्रयस्थांची व मध्यस्थांची गरज नाही. त्याचप्रमाणे ईश्वर व भक्त यांच्यामध्ये दलालाची जरुरी नाही.
३) मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नाही तर तो गुणाने ठरतो.
४) कोणताही ग्रंथ सर्वांशी प्रमाण व ईश्वर प्रणीत नाही.
५) ईश्वर सावयरूपाने अवतार घेत नाही.

अशा प्रकारची सत्यशोधक समाजाची तत्वे ही रा. ना.चव्हाणांनी सांगितली आहेत.

**मानवतावाद** :

रा. ना. चव्हाणांच्या मते, सत्यशोधक समाज हा मानवतावाद आहे. तो सर्व मानवासाठी आहे. ही चळवळ प्रांतीय व जातीय वाटते पण भोवतालच्या सामाजिक वादाच्या व परिस्थितीच्या ठेवणीचा दोष आहे. जसजशी समाजात एक विनशी अवस्था येत जाईल तसतशीही ही अनिष्ट घडण नाहीशी होईल. असे रा. ना. चव्हाणांचे मत होते.

**मानवाच्या गुणाला महत्त्व :**

रा. ना. चव्हाणांची मानवाच्या गुणाला महत्त्व दिलेले आहे. ते सांगतात, माणसाची योग्यता जन्मजातीवरून नाही, ती गुणकर्मावर आहे गुणामुळे माणसाची योग्यता वाढते. तो थोरवीस चढतो. समाजात गुणोत्कर्म झाला पाहिजे गुणांना प्राधान्य मिळाल्यास, गुणांचे चीज झाल्यास माणूस प्रगत होत जातो. मानवी उत्कर्ष जवळ येतो.

**जातीवर्ण भेदाविरुद्ध :**

विशिष्ट एकाच जातीची माणसे सर्वथा वाईट किंवा सर्वथा चांगली व निर्दोष असे व्यवहार म्हणतात यावयाचे नाही. म्हणून सत्यशोधक समाज जातीवर्ण भेदाविरुद्ध आहे. असे रा. ना. चव्हाण सांगतात. उददम स्वातंत्र्य त्यास मान्य आहे व कोणताही धंदा व व्यवसाय आणि जात अपवित्र नाही. श्रेष्ठ - कनिष्ठ, उच्च - नीच भाव नाही असे ते मांडतात.

**मूर्तीपूजेस विरोध :**

रा. ना. चव्हाण हे आपल्या सत्यशोधक समाज विषयक विचारांमध्ये मूर्ती पूजेला विरोध करतात. ते म्हणतात, धर्ममार्गात मूर्तिपूजा मुख्यतः भोळाभाव निर्माण करू शकते मूर्ती पूजेमुळे मंदिर संस्था निर्माण होते. मंदिर संस्थेमुळे साहजिकच उपाध्याय व पुरोहित संस्था निर्मावी लागते. मूर्ती पूजेचा त्याग केल्याशिवाय मुलगामी धर्म शुद्धी होऊ शकत नाही किंवा मूर्तिपूजा कायम ठेवून समाज प्रगती घडवून आणता येणार नाही. याच प्रमाणे मूर्ती पूजेमुळे पुरोहित संस्था निर्माण करावी लागते व पुरहित स्वतःचे उदर भरणार्थ नाना उपाय अवलंबून विडंबन करतात. मूर्ती पूजेमुळे दलाली वाढते व धर्म, देव आणि भक्ती यांचा छंद होतो असे रा. ना. चव्हाणांचे मत होते.

**मध्यस्थ नको :**

रा.ना.चव्हाणांच्या मते, आई बापास संतोष करण्यास त्रयस्थांची व मध्यस्थांची गरज नाही. त्याप्रमाणे ईश्वर व भक्त यांच्यामध्ये दलालांची जरुरी नाही . ही दलाली व हा बाजार नको म्हणून सत्यशोधक समाज मूर्ती पूजा व तत्सम म्हणजे संस्था मानीत नाही. मूर्ती पूजा प्रवृत्ती कमी करणे, नष्ट करणे हे समाजाचे कार्य आहे. मध्यस्थ नको म्हणणे स्वावलंबन पाहिजे, सहकार्य पाहिजे. मध्यस्थ नको हा संदेश फक्त कार्यापुरता किंवा धार्मिक क्षेत्रापुरता नाही. राजकारण अर्थकारण, समाजकारण, शिक्षण इ. क्षेत्रातही दलाली नको. स्वावलंबन पाहिजे. भोळा भाव नको असा समाजाचा पवित्रा आहे. भांडवल व नफा यांच्या दरम्यान ही दलाल नको. सहकार्याने संपत्तीचा विनियोग, वापर व लाभ सर्वांना झाला पाहिजे असे मत होते.

**एकेश्वरवाद :-**

रा. ना. चव्हाण एकेश्वरवादाविषयी मांडताना ते म्हणतात की, सत्यशोधक समाज एकेश्वरी आहे. भागवत धर्म हाच त्याचा प्राण आहे. परंतु मध्यस्थ ईश्वर किंवा गुरु यांच्यावर सर्वस्वी अवलंबून राहुन मानवाची खरी उन्नती होत नाही. मनुष्य स्वतःच्या बळावर नराचा नारायण होऊ शकतो ( उद्धरे दात्मनात्यानम) स्वतःचा उद्धार आत्मपरीक्षणाने मानवाने केला पाहिजे. असे ते मांडतात. कल्पनावादी विचारसरणी, परलोकवाद, दैववाद, नशीबवाद व हताशवृत्ती त्यांना अमान्य आहे. परावलंबन व निष्क्रिय निवृत्ती सत्यशोधक समाजास अमान्य आहे. तो ज्ञानाचा - ब्रह्मज्ञानाचा भोक्ता आहे. पण बुवाशाही त्यांना अमान्य आहे. पुरोहित शाही व बुवाबाजी हा रोग आहे. हा रोग खऱ्या धर्मालाही ग्रासतो असे रा.ना. चव्हाणांचे मत होते.

**निरेश्वर वाद :**

सत्यशोधक समाज मूर्ती पूजा टाकून शुद्ध एकेश्वर वाद अवलंबितो त्याप्रमाणे ते प्रामाणिक निरेश्वर वाद्यांना सत्यशोधक समाजात स्थान आहे असे रा. ना. चव्हाण मांडतात. ते म्हणतात, बुद्ध हा आद्यसत्यशोधक धर्मच आहे. मनुष्यात बुद्धीही अमोल देणगी आहे. व या देणगीचा वापर करणे मनुष्याचे कर्तव्य आहे. बुद्धी निद्रिस्त ठेवणे हा माणसाचा धर्म नाही. प्रत्येक माणूस हा खरोखर बुद्धिवादी बुद्ध व्हावयास हवा. असे रा.ना.चव्हाणांचे मत होते.

रा. ना. चव्हाणांच्या मते चावरक, बुद्ध, महावीर, ज्ञानेश्वर, तुकाराम इ. तत्सम महान संत त्या त्या काळातील सत्यशोधक झाले. राम मोहन, केशव चंद सेन , देवेंद्र, रवींद्र, जोतिबा फुले, आगरकर, आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे इ. आधुनिक काळातील सत्यशोधक झाले. सत्यशोधक एकाच देशात होतात असे नाही. सत्यशोधक सर्व स्थळी व काळी सत्यशोधक होतात. देश काळ व वर्तमान काळ यांची मर्यादा त्यांना नाही असे रा. ना. चव्हाण म्हणतात. मोठ्या पुरुषांना रा. ना. चव्हाण अवतार, विभूती किंवा देव माणिक नाहीत. तर त्या त्या काळातील असामान्य थोर पुरुष म्हणून या सर्व सत्यशोधकांना व संतांना स.शो. समान मान ते देतात. याचप्रमाणे रा. ना. चव्हाण म्हणतात, स्वावलंबन, स्वातंत्र्य, समता व सत्य यांची वाढ सत्यशोधक समाज तत्वे करू शकतात व ही तत्वे म्हणजे प्रकाश आहे, ज्ञान आहे. नव्या पिढीने याचा अभ्यास जरूर करावा म्हणून त्याचे व्यापक व सांप्रदायातील स्वरूप येथे मांडले आहे. महात्मा फुले हे मार्गदर्शक आहेतच पण त्यांच्यासारखे अनेक फुले यापुढे निर्माण व्हावेत. त्यांची जनमानसास जरुरी आहे. आणि अशा सुवासिक फुलांचा एक पुष्पहार तयार होवो. पुष्प मालिका बनो. एकाचे हे काम नव्हे अनेक त्यागी कर्मवीरांच्या आहूत्या सत्य यज्ञासाठी लागतात. म्हणजे सत्यशोधक समाजाचा तारा अधिक प्रकाशित व मार्गदर्शक होईल. विरोधकांना आणि निंदकांनाही तो प्रकाश देईल कारण तो स्वयंप्रकाशित आहे. परिस्थितीचे व वादाचे ढग बाजूस चालले आहेत. नव्या काळात त्याचे नऊ दर्शन घेतले पाहिजे अशी भूमिका ते स्पष्ट करतात.

**निष्कर्ष :-**

सत्यशोधक समाजाचा उद्धाता म्हणून महात्मा फुले यांनामहत्त्वाचे स्थान असलेले दिसून येते. त्यांनी सांगितलेल्या तत्त्वांचा पुरस्कार हा रा. ना. चव्हाणांणी केलेला आहे. सत्यशोधक समाज हा मानवतावादी आहे. कोणत्याही जातीवर आधारित नाही. यामध्ये माणसाच्या गुणाला वाव देण्यात आला आहे. सत्यशोधक समाज हा जाती वर्णभेदाविरुद्ध आहे. सत्यशोधक समाजाने मूर्तिपूजेला विरोध करून पुरोहितांची व मध्यस्थांची भूमिका त्याने अमान्य केली आहे. सत्यशोधक समाज हा एकेश्वरी आहे. त्याने ईश्वरावर सर्वस्वी अवलंबून राहून खरी उन्नती होणार नाही तर मानवाने स्वतःचा उद्धार स्वतः केला पाहिजे हे महत्त्वाचे तत्व त्यांनी मानले आहे. म्हणूनच आजही सत्यशोधक समाजाच्या विचारांची गरज भासत आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) ठोके, मो. नि. ( सं ), 'रा. ना. चव्हाण निवडक वाडमय', पारख प्रकाशन, बेळगाव, 1986.
२) चव्हाण, रमेश ( संपा. ), 'सत्यशोधकाची चिंतानिका', रा. ना. चव्हाण जन्मशताब्दी वर्ष, २०१२